Vol 6 Issue 12 Sept 2017

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**


Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## Regional Editor

Dr. T. Manichander

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........




**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017

REVIEW OF RESEARCH

# वामनदादा कर्डकांच्या राष्ट्रकाव्यातील राष्ट्रीय जाणिवा आणि राष्ट्रप्रेम

*प्रा. डॉ. युवराज श्री. मानकर*
*मराठी विभाग व संशोधक , मार्गदर्शक, शिवशक्ती कला, वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगाव, जि. यवतमाळ.*



**सारांश :—**

महाकवी वामनदादा कर्डक हे सर्जनशील कवी, कलावंत आहेत. त्यांनी समाज व राष्ट्रउन्नतीकरिता साहित्य निर्मिती केली आहे. त्यांची काव्यगीते "महाकवी वामनदादा कर्डक समग्र वाङमय, खंड चौथा, याचे संपादन माधवराव गायकवाड आणि डॉ. सागर जाधव यांनी 'राष्ट्रकाव्य' म्हणून केले आहे. या राष्ट्रकाव्यातून महाकवी वामनदादा कर्डकांनी आंबेडकरवादी दृष्टीतून देशातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि परदेश नीतीची जाणीव व्यक्त केली आहे. राष्ट्रांतर्गत असलेल्या राष्ट्रद्रोही शक्ती राष्ट्राचे राष्ट्रपण उद्ध्वस्त करण्यास कारणीभूत ठरत आहे. तसेच राष्ट्रबाहेरील शक्ती राष्ट्राची सुरक्षितता धोक्यात आणत आहे. भारताच्या स्वातंत्र्याला आणि त्याच्या सार्वभौमत्वाला, अखंडतेला देशांतर्गत आणि देशाबाहेरीलशक्ती देशपण प्राप्त करू देत नाही. याची जाणीव व्यक्त केली आहे आणि या देशाला देशपण व जगाला जगपण फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बुध्दांशिवाय प्राप्त होऊ शकत नाही. अशी निष्ठा व त्यांचे देशप्रेम व्यक्तझाले आहे.

**प्रस्तावना :—**

वामनदादा कर्डक हे आंबेडकरी चळवळीतील आंबेडकरवादी कवी, गायक आणि नामवंत शाहिर आहेत. डॉ. आंबेडकरांचे जीवन कार्य व विचार आंदोलन यावर त्यांची प्रचंड निष्ठा आहे. हया निष्ठेचा प्रत्यय त्यांच्या काव्यगीतातून प्रकर्षाने आढळतो. या देशातील पारंपरिक मन बदलून टाकणे हे त्यांच्या काव्यगीतांचे वैशिष्टये आहे. त्यांचे काव्य समाजप्रबोधन व राष्ट्रोन्नतीकरिता जन्माला आले आहे. अशी काव्यगीताकडे पाहण्याची आधुनिक दृष्टी त्यांनी काव्यगीतकारांना दिली. त्यामुळे ते जीवनाचे गाणे गाणारे म्हणून ओळखले जातात. त्यांच्या काव्य गीताचा हेतू प्रबोधन आणि प्रवर्तन हाच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि आचारांचा प्रचंड प्रभाव त्यांच्या काव्यगीतातून पहावयाला मिळतो. आंबेडकरी विचार समाजमनात रूजविणे आणि लोकजागृती घडविणे हया ध्येयसिध्दीची प्रतिज्ञा त्यांच्या काव्यगीताने घेतलेली आहे. आंबेडकरी विचाराने आपले काव्यगीत अनेकांनी श्रीमंत केले आहे. त्यात श्रीधर ओहळ, भीमराव निरभवणे, दीनबंधू शेगावकर, दलितानंद, अमृतबुवा बावस्कर, नागोराव पाटणकर, राजानंद गडपायले इत्यादींचा समावेश आहे.

वामनदादा कर्डक रचनाकार आणि गायक झाले त्यापाठीमागे आंबेडकरी विचारप्रेरणा आणि जीवनदृष्टी कारणीभूत आहे. माणसातल्या तुफानाची जाणीव आंबेडकरांनी करून दिली, आणि वामनदादा आपल्यातील प्रकाश उर्जेचा उजेड गाणे गाण्यातून व रचनानिर्मितीतून करू लागले. ते म्हणतात, "माझ्या आवाजाची जाणीव मी गाऊ लागलो तेव्हा झाली आणि मी रचना करू लागलो. म्हणजे त्रैचाळीस साली हो, त्याचवेळी जाणवलं की, मी गीतरचना करू शकतो आणि माझ्या गीतरचनेला लोक समजू शकतात. मान देतात."(१) वामनदादांनी आपली क्षमता एकविस रजिस्टर मध्ये केली आहे. त्यांनी एकविस रजिस्टर मध्ये लिहून ठेवलेली काव्य – गीते माधवराव गायकवाड व डॉ. सागर जाधव यांनी 'महाकवी वामनदादा कर्डक : समग्र वाङ्मय खंड १ ते ७ मध्ये संपादित केली आहे. त्यातील चौथा खंड राष्ट्र काव्य' आहे. या राष्ट्रकाव्याचा जसा भाषेशी, जीवनाशी आणि कलात्मकतेशी संबंध आहे. तसाच त्याचा देशातील प्रश्नांशी आणि देशप्रेमांशी सुध्दा संबंध आहे. वामनदादांच्या कलावंत मनाचा देशातील प्रश्नांशी आणि देशप्रेमांशी सुध्दा संबंध आहे. वामनदादांच्या कलावंत मनाला देशांतर्गत समस्येने आणि देशबहिर्गत समस्येने पछाडून टाकले आहे. या समस्येकडे ते वैचारिक बांधिलकी स्वीकारलेल्या आंबेडकरी विचार नेत्राने बघतात.

**शोधनिबंधाची समस्या :—**

आज देश धोक्यात सापडला आहे. देशाची सुरक्षितता, अखंडता, त्याचे सार्वभौमत्व, त्याचे स्वातंत्र्य धोक्यात आले आहे.

त्याला कारण राष्ट्रांतर्गत असलेल्या धर्मांध शक्ती जशा कारणीभूत आहेत तशाच देशबहिर्गत आक्रमक आणि विस्तारवादी मनसूब्या शक्ती कारणीभूत आहेत. देशांतर्गत भाषा, प्रांत, सीमावाद, कट्टर धर्मांधता, धर्माचे ठेकेदार, सांप्रदायिकता, सास्कृतिक सत्ता संघर्ष, जमातवाद, मुलततत्ववाद, आंतकवाद, नक्षलवाद, दहशतवाद, राजकीय सत्ता नेतृत्वाने स्वीकारलेली भगवी धर्मांधता, आणि धार्मध ठेकेदारांचे पोषण व संरक्षण, देशापेक्षा हिंदु राष्ट्रवाद मोठा, ही तत्वप्रणाली मोठी मानण्याची प्रवृत्ती ब्राम्हणवाद आणि भांडवलवाद, जातीय संघर्ष, जातीय अत्याचार संविधान बदलण्याची भाषा इत्यादी सत्ता शक्ती देशाच्या अखंडतेला मूठमाती देण्याचा प्रयत्न करीत आहे. तर देशबहिर्गत जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणामुळे सरकारीकरण संपुष्टात येऊ लागले आहे. देशाच्या नेतृत्वाला भांडवलशाही आणि कम्युनिझम आपल्याकडे वेधण्याचे कार्य करीत आहे. यात नेतृत्वाची राजकीय कुटनीती पणाला लागते आहे. शेजारील राष्ट्रासोबत सलोख्याचे, मैत्रीचे संबंध नाहिसे झाले आहे. भारतीय सीमा शेजारील राष्ट्रांनी असुरक्षित केल्या आहेत पाकिस्तान काश्मिरच्या प्रश्नावरून तर चीन डोकलामच्या प्रश्नांवरून सातत्याने भारताला त्रस्त करू लागला आहे. देशात परदेशीय घुसखोरी वाढली आहे. इत्यादी शक्तीमुळे देश असुरक्षित झाला आहे. त्यामुळे देशातील सर्वसामान्य माणूस स्वदेशातील शक्तीच्या प्रकोपामुळे अधिकच असुरक्षित झाला आहे. त्याच्यासाठी लोकशाही हाच एकमेव विकासाचा मार्ग होता पण तिचेही अस्तित्व धोक्यात आल्याने जीवन जगण्याची  प्रचंड भीती निर्माण झाली आहे. देशापेक्षा हिंदुतत्वज्ञान मोठे मानले जात असल्याने देश आणि देशांच्या संविधानाच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. जोपर्यंत देशात सामाजिक आणि आर्थिक समता निर्माण होणार नाही तोपर्यंत हा देश राष्ट्र म्हणून उभा राहु शकणार नाही ‘आम्ही भारताचे लोक‘ यातील लोक ‘हे आम्ही‘ या बंधुभावनेने बांधलेले आहेत. पण या देशातील मानवनिर्मित विविधता या बंधुभावनेला, स्वातत्र्य, समता आणि न्यायाला चिरडून टाकत आहे. या पार्श्वभूमीवर या राष्ट्रकाव्याने नवीन भारताच्या नवनिर्माणासाठी कोणते भावविचारमूल्ये मांडले आहे. याद्वारे या देशाला कोणती चेतना दिली आहे आणि त्यातून वामनदादा कर्डकांचे राष्ट्रप्रेम कसे व्यक्त झाले आहे. हा या शोधनिबंधामागील मुख्य हेतू आहे.

*बीजशब्द :–* वामनदादा कर्डकांचे राष्ट्रकाव्य, राष्ट्रसंकल्पना, राष्ट्रकाव्यातील जाणिवा, त्यातून व्यक्त झालेले राष्ट्रप्रेम.

### *लेखन साहित्याचा आढावा :–*

वामनदादा कर्डक यांच्या साहित्यांवर अनेकांनी एम.फील, तसेच आचार्य पदवीकरिता संशोधन केले आहेत. वामनदादांच्या निवडकगीतांचे संकलन, त्यांच्यावरील समीक्षात्मक ग्रंथ, संपादन अनेकांनी केले आहे. परंतु त्यात समग्रतेचा अभाव आहे. वामनदादांच्या काव्यगीताचे विविध पैलू, त्याचा आशय व अभिव्यक्ती विस्तार केला आहे. परंतु माधवराव गायकवाड व डॉ. सागर जाधव यांनी ‘महाकवी वामनदादां कर्डकः समग्र वाङ्मय खंड– १ ते ७ प्रकाशित केले असल्याने जो समग्रतेचा आजवर अभाव होता तो आता दूर झाला आहे. आणि वाचकांपुढे आता वामनदादांचे समग्र वाङ्मय आले आहे. यातील चौथा खंड १४ एप्रिल २०१६ रोजी प्रकाशित झाला असून त्यात एकूण ३८६ काव्यगीते आहेत आणि ही काव्यगीते राष्ट्रांवर निस्सिम प्रेम करणारी आहेत. या राष्ट्रकाव्यगीतांवर अद्यापपर्यंत संशोधन झालेले नाही. जे झाले ते त्रोटक स्वरूपाच्या राष्ट्रीय जाणिवा व्यक्त करण्यासंबंधी झाले आहे. डॉ. महेंद्र भवरे, डॉ. यशवंत मनोहर यांनी हा प्रयत्न केला आहे. पण विशेषतः वामनदादांच्या प्रकाशित चौथ्या खंडातील राष्ट्रावरील निस्सिम प्रेमांचा कोणीही शोध घेतलेला नाही. हे एक आणि दुसरे असे की वर्तमानकालीन देशांतर्गत समाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि देश बहिर्गत वातावरण लक्षात घेता, वामनदादांच्या राष्ट्रीय जाणिवा आणि त्यांचे राष्ट्रप्रेम कशा स्वरूपाचे आहेत. याचा शोध घेणे हाच या शोधलेखन प्रपंचामागील हेतू आहे.

### *संशोधन पध्दती :*

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता माधवराव गायकवाड व डॉ. सागर जाधव संपादित‘ ‘महाकवी वामनदादा कर्डकः समग्र वाङ्मय खंड चौथा या आधारवड ग्रंथाच्या व इतर संदर्भ ग्रंथाच्या साहाय्याने विश्लेषणात्मक, वर्णनात्मक आणि समकालीन आकलनात्मक पध्दतीच्या द्वारे अभ्यास करण्यात येत आहे.

### *विषय विश्लेषण :–*

वामनदादा कर्डक यांची साहित्यसृष्टी डॉ. आंबेडकरांच्या विचाराने बहरली आहे. त्यांच्या राष्ट्रकाव्यरचनेचा मुलाधार व जीवन दृष्टी आंबेडकरवाद हाच आहे. या दृष्टीतून ते आपल्या देशाला आणि देशबांधवांना राष्ट्रकाव्यातून राष्ट्रप्रेमांची, राष्ट्रीय जाणवेची जाणीव करून देतात. तेव्हा राष्ट्र म्हणजे काय? या संकल्पनेचा विचार करणे अपरिहार्य आहे.

### *राष्ट्र संकल्पना :*

राष्ट्र म्हणजे नुसती भूमी किंवा विशिष्ट भू–भौगोलिक प्रदेश, त्यावरील दगड–धोंडे नव्हे. तर या भूमीवर वास्तव्य करीत असलेले समाजजीवन, या जीवनातील लोक आणि या लोकांनी निर्माण केलेल्या सर्वच बाबी ‘राष्ट्र‘ या संकल्पनेत येतात.

लोकांनी निर्माण केलेल्या जाती, धर्म, पंथ, वर्ण, वर्ग, वंश आणि तत्वज्ञान म्हणजे राष्ट्र नाही. अशा विविध तुकडया–तुकडयांनी विभागलेले आणि आचरण करणारे लोक हे राष्ट्र ठरू शकत नाही. समाजिक आणि आर्थिक दृष्टया प्रचंड विषमता भोगत असलेले लोक राष्ट्र ठरू शकत नाही. हिंदूस्थान आणि भारत यात विभागणी करणारे मन, विचार राष्ट्र ठरत नाही.

राष्ट्र म्हणजे त्या भूमीवरील सर्वच लोक समुह आणि या लोकसमुहातील जीवनाच्या व राष्ट्रजीवनाच्या एकात्मतेवर, बंधुभावनेवर, स्वातंत्र्य, समता आणि न्यायावर असलेली प्रगाढ निष्ठा म्हणजे राष्ट्र होय.

राष्ट्राच्या आजवर अनेकांनी व्याख्या केल्या आहेत. डॉ. अशोक चौसाळकर यांनी संपादित केलेल्या धर्म, समाज आणि राजकारण या ग्रंथातील संजय संगवई यांनी अल्पसंख्यांकांचा जामातवाद या लेखात हॅन्स कोहेनची व्याख्या सांगितली आहे. ”वंश, धर्म, भाषा किंवा इतर विचारांवर राष्ट्र नसंत राष्ट्र म्हणजे ‘दी विल टु लिव्ह टुगेदर“ फॉर दी फ्युचर‘ भविष्यासाठी एकत्र राहण्याची आपली इच्छाशक्ती म्हणजे राष्ट्र“ (२)

या व्याख्येचा विचार भारताच्या संदर्भात करणे अधिक महत्वाचे आहे. आपल्या देशातील बांधव वर्तमान सोडा पण भविष्यासाठी तरी एकत्र राहण्याची इच्छा मनात धरतात का? आणि राहतात का? भारताचे सार्वभौमत्व, त्याची अखंडता, स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी बंधुभावाच्या, मैत्रीच्या आणि शांततेच्या नात्याने लोक एकत्र राहतात का? तसेच आपला देश परदेशाशी मैत्री भावनेने राहतो का? या प्रश्नाचे उत्तर नाही असेच आहे.

वामनदादा कर्डकांनी देशाचे सार्वभौमत्व व त्याची अखंडता अबाधित ठेवण्यासाठी देशांतर्गत सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि देश-विदेशातील सलोख्याच्या नातेसंबंधाचा अभाव खऱ्या अर्थाने कारणीभूत असल्याचे ते विशद करतात आणि त्यावरील उपाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बौध्द जीवनप्रणाली आहे. हे त्यांच्या राष्ट्रकाव्यातून ते मांडतात. यातून त्यांचे राष्ट्रप्रेम आपल्या लक्षात येते.

### *वामनदादांच्या राष्ट्रकाव्यातील सामाजिक धार्मिक जाणीव व त्यांचे राष्ट्रप्रेम :*

वामनदादा कर्डकांनी आपल्या राष्ट्रकाव्यगीतातून या देशाचे सार्वभौमत्व, त्यांचे स्वातंत्र्य आणि अखंडत्व अबाधित ठेवण्याची भावजाणीव व्यक्त केली आहे. त्यांच्या राष्ट्रकाव्यातून सामाजिक एकात्मतेची आणि बंधुभावाची जाणीव व्यक्त झाली आहे. त्याला कारण या देशातील समाज मन या राष्ट्राचे अखंडत्व नष्ट करण्याच्या मागे लागले आहेत. या देशात सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय अशा अनेक पातळयांवर समाज विभागला गेला आहे. सामाजिक दृष्टया समाजाचे वंश, वर्ण, वर्ग, जात, धर्म, पंथ, भाषा आणि प्रांत अशा अनेक तुकडयात विभाजन झाले आहे. हे विभाजन परस्परात भेद जाणीव निर्माण करीत आहे. त्यामुळे भारत म्हणजे अनेक भेदाची गोधडी असे रूप या देशाला प्राप्त झाले आहे. सामाजिक जीवन जातीनी, धर्मांनी जसे दुभंगले तसेच ते आर्थिक विषमतेनेही दुभंगले. त्यामुळे या विविधतेत एकता निर्माण करून एकमय राष्ट्रांची उभरणी करणे हे फार महत्वाचे कार्य आहे. हे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाद्वारे केले आहे. ‘आम्ही भारताचे लोक‘ या वाक्यातुन त्याची प्रचिती येते. त्यांनी सामाजिक-आर्थिक समता म्हणजे एकमय लोकशाही राष्ट्र, त्यात त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची पेरणी केली. परंतु या देशातील लोकांना ‘आम्ही या शब्दांचा अर्थ कळला नाही आणि लोक ‘आम्ही‘ ऐवजी ‘मी, मी‘ झाले. यासारख्या समाजवास्तवाने वामनदादा चिंतित झाले आणि त्यांनी ‘भारता-भारता, भारत-भूमी, नांगरणी, खपणारे, कोंडमारा, वागणे, विकास, माणसा, बांधायाची कबर, असा देश आहे. संसार, नवासंदेश, भारताचे चित्र, कथा, गडी, चारा, माणूस, हवा अशा अनेक गीतातून सामाजिक वास्तवाची जाणीव व्यक्त केली आहे.

”जात माणसाला दावली मनूने“
कीड भारताला लावली मनूने
कीड लावलेल्या काळया मनूसम
भारतामधी या कृमी आज नाही” (३)

या देशातील लोकांना जातीने विभागणारा आणि जातीत डांबणारा ‘मनूस्मृती लिहिणारा ‘मनू‘ आहे. त्याने लोकांना जात दाखवली, त्यांच्या मन आणि मेंदूत पक्की केली. या जातीने समानजात भाईमध्ये एकता आणि बंधुता निर्माण केली. आणि असमान जातीमध्ये तुच्छतेची, घृणेची भावना निर्माण केली. देशाचे अखंडत्व या जातमनस्क आजाराने हिरावून घेतले. भारतीय समाजजीवन या जात मनस्कवृतीने किडलेले आहे.

जात ही समाजाच्या दारिद्रयाला कारणीभूत आहे. समाज हा जातीच्या कक्षेतच राहून सर्व व्यवहार करतो आहे. जातीची हद्द ओलांडून व्यवहार करणे निषिध्द मानले जात आहे. त्यांच्या या व्यवहारांमागील मनाचा संबंध हा उत्पादन आणि विभाजनाच्या अर्थनीतीशी आहे. जातीने समाजातील लोकांचे व्यवसाय निश्चित केले आणि त्यांच्या त्यांच्या जातनिहाय व्यवसायातून त्या त्या जातींना प्राप्त होणारे अर्थही निश्चित केले. त्यामुळे कनिष्ठ जातीतील लोकांचे व्यवसाय, त्यातून प्राप्त होणारे अर्थ, त्यांचा दर्जा आणि त्यांचे मूल्य निश्चित केल्याने कनिष्ठ जातीला कनिष्ठ दर्जा प्राप्त झाला आणि त्यांच्या वाटयाला प्रचंड आर्थिक दारिद्रय व सामाजिक अप्रतिष्ठा मिळाली. त्यामुळे चांभाराचा व्यवसाय चप्पले जोडे तयार करणे,कुंभाराचा व्यवसाय मडके तयार करून वरिष्ठ जातीची वा वर्णाची सेवा करणे हे अशा जातीच्या भाळी आले. अशा या अनेक जातींना, व्यवसाय, कार्य आणि अर्थदृष्टया बंदिस्त केल्यामुळे दारिद्रय, तसेच एक जात दुसऱ्या जातीला परकी मानू लागली. एक समाज दुसऱ्या समाजाला परका समजू लागला. या देशात सामाजिक आणि आर्थिक विषमता महाभयंकर असल्यामुळे भारतीय समाजजीवनात एकात्मतेचा, बांधिलकीचा फार मोठा अभाव निर्माण झाला. हा अभावच या देशातील सामाजिक-आर्थिक समता निर्माण करण्यात आणि एक राष्ट्र म्हणून उभे राहण्यात कारणीभूत ठरला.

या सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे पोषण या देशातील धर्मसंस्थेने केले आणि त्यांच्या ठेकेदारांनी केले. सामाजिक व आर्थिक विषमतेचे मूळ धर्मसंस्थेत असल्याने धर्माची पुनर्रचना करणे अनिवार्य झाले. परंतु धर्माची पुनर्रचना करण्याचे ज्यांनी धाडस दाखविले त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. धार्मिक दंगली वाढू लागल्या आहेत.

"धर्माने ग्रासलेल्या जनते पुढे"
वैराने ग्रासलेल्या जनते पुढे
भारताच्या एकतेचे ताट वाढू
त्यातून आम्ही आमची वाट काढू" (४)

धर्मामुळे या देशात वैर वाढले आहे. धार्मिक गुलामी वाढली असल्याने धर्माच्या आड धर्माचे ठेकेदार भावनिक अत्याचार करीत आहे. तसेच ते शारीरिक अन्याय-अत्याचार करीत आहे. राजकारणी नेते त्यांचे वोट बॅंक म्हणून पोषण करीत आहे. त्यामुळे भारत एकात्म होऊ शकत नाही.

"जो पर्यंत चाकरी आणि भाकरीचा प्रश्न आहे.
तो पर्यंत भारत गुलामच आहे."

या देशातील समाजमन धर्माच्या गुलामीतून मूक्त झाले नाही. आजही मनुवादी शासकांची सत्ता समाजमनावर ठसलेली आहे. या स्वकीयांच्या गुलामीतून सर्व सामान्यांचे जीवन मूक्त होणार नाही तो पर्यंत चाकरीचा आणि भाकरीचा प्रश्न शिल्लकच राहणार आहे आणि समाज जीवन गुलामीतच राहणार आहे.

या देशातील समाजजीवनात श्रेष्ठ-कनिष्ठ असा भाव आहे. असे असतांनाही 'हम सब एक है' असा खोटा जयघोष केला जातो आहे.

"देशाचा ताज आहे देशाची एकता, धोक्यात आज आहे देशाची एकता,जाळी न कुनी येथे ही उच्चनीचता, खोटा आवाज आहे देशाची एकता"६)

या देशाचे वैभव एकतेत आहे. पण एकात्मतेला भंग करण्याचे कार्य येथील समाजजीवनातील उच्च-नीच भाव करीत आहे. चातुवर्ण्य व्यवस्था याला कारण आहे. ही व्यवस्था उद्ध्वस्त करण्यासाठी कोणीही गंभीरपणे विचार करीत नाही. समाज व्यवस्थेतील जातीय व्यवस्था नाहीसी करीत नाही.

"भारताचे खरे तारे,एक व्हावा आता सारे
फुट माणसात पाडणारी, जात जाळा तुम्ही सारी
सारे जातीत जळणारे एक व्हावे आता सारे" ७)

या देशाचे खरे तारे सर्व सामान्य माणसे आहेत. त्यांच्या तळपण्याने या देशातील माणसा-माणसात फुटपाडणारी जातीय व्यवस्था जळली जाईल आणि हा देश एकत्मतेच्या प्रकाशाने प्रकाशमान होईल त्यासाठी जातीय व्यवस्थेचे चटके ज्यांच्या वाटयाला आले त्यांनी ही चटके देणारी, माणूसपणा नाकारणारी व्यवस्था संपविण्यासाठी एक होण्याचे आवाहन करतात.

आजवर या देशात प्रतिक्रांतीच्या समर्थकांनी देशद्रोह केला आहे. देशातील सामाजिक जीवन धर्मव्यवस्थेच्या, चातुर्वर्ण्यव्यवस्थेच्या आणि जातीव्यवस्थेच्या द्वारे उद्ध्वस्त केले आहे. समाजाला रूढी, प्रथा, परंपरेच्या अधिनस्थ केले आहे. त्याला एक होण्यासापासून रोखले, देशाची एकत्मता धोक्यात आणली, अशा तुटलेल्या, फाटलेल्या, नाकारलेल्या माणसाच्या मनाची व मेंदूची पुनर्रचना डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी केली. त्यांनी संविधानाद्वारे सर्वाना मान - सन्मान, प्रतिष्ठा दिली, प्रथम भारतीय आणि अतिमही भारतीय असा परमोच्च पातळीवरचा राष्ट्रवाद दिला. मानवी हक्क- अधिकार दिले, नवीन जीवनमूल्ये दिली. म्हणून वामनदादा कर्डक खऱ्या देशभक्त माणसाला सूचना, आंबेडकरांच्या वचनाची आठवण आणि त्यांच्यातील अश्वासक क्षमतेची त्याला जाणीव करून देतात.

"भले बुरे देशाचे करणारा तुच ना, ऐक सज्जना भावी भल्यची ही सूचना
बदल आता तू अनर्थकारक ही रचना, देश हितास्तव आठव भीमाच्या वचना
भीम तत्वाचा घे आधार, मानवतेने अन् शृंगार, हा संसार हा संसार" (८)

देशाचे हीत लक्षात घेऊन देशातल अनर्थकारक रचना बदलविण्यासाठी या देशातील सर्व सामान्य माणसाला ते आवाहन करतात आणि हा बदल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाने करून या देशातील समाजव्यवस्थेत मानवता निर्माण करावी असे ते म्हणतात.

***वामनदादांच्या राष्ट्रकाव्यातील आर्थिक जाणीव आणि त्यांचे राष्ट्रप्रेम :***

२६ जाने १९५० रोजी भारतीय संविधानाची अमंलबजावणी सुरू झाली ही अमंलबजावणी जुन्या मानसविश्वाचा मृत्यू सांगणारी आणि नव्या भारताची पुनर्रचना करणारी आहे. राजकीय लोकशाही या देशात निर्माण झाली पण आर्थिक लोकशाही अद्यापपर्यंत निर्माण करता आली नाही. त्याला कारण या देशातील ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हे होय. ब्राह्मणवादाने या देशातील समाजाच्या श्रध्दायुक्त भावना मंदिरात कोंबलेल्या ईश्वरांशी बांधल्या आणि त्याच्या नावाने अमर्याद संपत्तीचा संचय केला. तर भांडवलदारांनी या देशातील कष्टकऱ्यांचे रक्त शोषून विदेशातील बॅंकात काळा पैसा दडवून ठेवला. या दोघांनीही देशाच्या

विकासाच्या नावावर शोषणच केले, त्यांचे बेगडी राष्ट्रप्रेम आपणास प्रत्ययाला येते. वामनदादा 'आमचा वाटा' या कवितेतून पुढील ओळीत आपले प्रश्न विचारतात.

"सांगा आम्हाला बिर्ला बाटा टाटा कुठं हाय हो
सांगा धनाचा साठा, आमचा वाटा कुठं हाय हो"(९)

या देशातील सर्व सामान्य माणूस आर्थिकदृष्टया गरीब का राहिलात, त्यांचा धनातील वाटा कुठे आहे. कारण या देशात श्रीमंत आणि गरीब यांच्यात प्रचंड विषमतेची दरी निर्माण झाली आहे. या देशात सर्व सारखे नाही. आणि तसे प्रमाणक नाही. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी लोकशाही राज्यसमाजवाद आणण्याचा प्रयत्न केला. परंतु या देशातील धनप्रेमींनी तो हानून पाडण्याचा प्रयत्न केला. असा राष्ट्रद्रोह या देशात केला जात असेल तर सर्वसामान्य, न्यायवंचित, संधीवंचित समाज लोकशाही ठोकरून देतील

"असो कोणी टाटा असो कोणी बाटा
मागणार आता कमाईत वाटा
आमची कमाई आम्हालाच नाही
कान ठोकरावी अशी लोकशाही"(१०)

लोकशाही मध्ये न्याय वंचित कष्टकरी समाजाला कमाईत वाटा मिळाला नाही तर कोणी बाटा, टाटा असो त्यांना कमाईतील वाटा मागणार आहोत, तो न मिळाल्यास अशी आर्थिक विषमतेने बरबटलेली लोकशाही ठोकरून दिली जाईल.

वामनदादा या देशाच्या भवितव्याची चिंता व्यक्त करतात, कारण जागतिकीकरणाचे वादळ आल्याने प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. लोकशाही ही कागदावरच उरणार असून खाजगीकरणाच्या हाती सत्ता जाणार आहे. सरकारीकरण नष्ट होणार आहे. त्यामुळे सरकारच्या भरोश्यावर जीवन जगण्याची आशा करणारे आता निराश होणार आहे.

"टाटा बिर्ला तरतील, बाकी सारेच उपाशी मरतील
सरे परदेशी येतील, ताबा धंद्याचा घेतील
तेच तिजोरी भरतील, बाकी सारेच उपासी मरतील" ११)

आर्थिकदृष्टया जो संपन्न तोच जगणार, तोच या जीवघेण्या स्पर्धेत टिकणार विदेशी लोक येऊन येथे व्यवसाय थाटतील, आपले धंदे नष्ट होतील विदेशी तिजोऱ्या भरतील आणि आपली उपासमार होईल त्यासाठी या देशात असलेले ब्राह्मणवादी आणि भांडवलवादी हे खरे कारणीभूत आहेत. तेच या देशाचे दुश्मन आहे. यांच्या खाजगी मालमत्तेचे निराकरण केले तर या देशातील उपासमार टळणार आहे. यासाठी डॉ. आंबेडकरांनी सांगितलेल्या राज्यसमाजवादाची काटेकोर अमंलबजावणी करणे अनिवार्य आहे. आर्थिक विषमता निर्मूलन राज्यसमाजवादानेच शक्य आहे. "दारिद्रय हेच अनेक सामाजिक विकृतीचे, राजकीय हक्क शून्यतेचे आणि धार्मिक अंधश्रध्दाचे मूळ कारण आहे. तसेच खाजगी मालमत्तेच्या निराकरणातूनच दारिद्रय निर्मूलन होऊ शकते, अशी खात्री असल्यामुळे उत्पादन साधनावर राज्याची मालकी असावी." १२) राज्यांनी अशी उत्पादनाच्या साधनावर मालकी निर्माण केल्याशिवाय या देशातील आर्थिक विषमता नष्ट होणार नाही. आणि देशात एकता, बंधुभाव निर्माण होणार नाही. म्हणून आर्थिक लोकशाही प्रत्यक्षात येण्याची गरज आहे."

### *वामनदादांच्या राष्ट्रकाव्यातील राजकीय जाणीव व त्यांचे राष्ट्रप्रेम :*

राजकीय लोकशाहीत 'एक मनुष्य एक मत' अशी राजकीय समता प्राप्त झाली आहे. त्यामुळे गोर-गरीब कष्टकरी व्यक्तीच्या मताला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. यांच्या मताचा सौदा करून नेते निवडणूकीत निवडून येऊ लागले आहेत. राजकारण हा त्यांच्यासाठी व्यवसाय झाला आहे. या व्यवसायाची पात्रता प्रचंड श्रीमंती आणि गुन्हेगारी प्रवृत्ती ही आहे. यात पैसे लावणे आणि पैसे कमविणे हाच एकमेव उद्देश दिसून येतो आहे.

"असा कसा तू नेता, जनतेने निवडून देता
तुझ्या हातात सत्ता येता, तुला तुझ्या सुखाची चिंता
अन् इकडे मरू लागली जनता" १३)

राजकारण हा व्यवसाय आणि त्यांची पात्रता लक्षात घेता निवडून आलेला प्रतिनिधी गमाविलेले रूपये कमावण्याचे कार्य करतो. जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष देण्याऐवजी त्यांचे स्वस्वार्थासाठी शोषण करतो, गुंडप्रवृत्तीचे पोषण आणि त्याचा विस्तार करतो, अशा निवडून आलेल्या प्रतिनिधीमध्ये प्रचंड अज्ञान हे त्यांच्यातील अल्पशिक्षणाने आलेले आहेत. त्यामुळे त्यांना जनहितार्थ कायदे करता येत नाही. चुकीचे कायदे अथवा सुधारणा घडवून आणतात. त्यामुळे सामान्यजनतेचे प्रश्न सोडविण्याचा अभाव राजकीय वर्तुळात पाहावयाला मिळतो. म्हणून वामनदादा 'असावा नसावा' या कवितेत म्हण्तात.

"अन्यायाची चिरी चांबडी
असा पुढारी असावा
पिळवणूकीला लोणी चारी
असा पुढारी नसावा"(१४)

राजकीय नेता कसा असावा आणि कसा असू नये याबाबत सर्वसामान्याची अपेक्षा यातून व्यक्त केली आहे. भीमा सारखा नेता असावा, अन्यायाला विरोध करणारा, जात जाळणारा, घातक नीतीला साळणारा, देशाचा माथा गौरवाने उंच करणारा असावा, जगाला जिंकणारा असावा परंतु ही अपेक्षा पूर्ण होत नसेल तर वामन दादा 'नवा निर्धार' या कवितेत म्हणतात.

"नवे नेते नवे सरकार, हाच आता नवा निर्धार
यारे सारे उपाशी गडी, नवी पलटन करूया खडी
नवी सेना नवे सरदार, हाच आता नवा निर्धार"(१५)

जनतेच्या भल्यासाठी सत्ता परिवर्तनासाठी नवा निर्धार व्यक्त करतात आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरासारख्या खऱ्या पुढाऱ्याची अपेक्षा करतात. परंतु भारतीय राजकीय वास्तव यापेक्षा भिन्न असलेले दिसते. जनतेचे प्रश्न सोडविण्याऐवजी नवे हिंदुराष्ट्रवादी भावनिक प्रश्न निर्माण केले जातात.

"ऊत आला, ऊत आला, ऊत आला
हिंदुराष्ट्रवादाला ऊत आला"(१६)

भारताची विभागणी हिंदुराष्ट्रवाद आणि संविधाननिष्ठराष्ट्रवाद या दोन भागात केली जात आहे. यातून बहुसंख्यांक जात धर्मियाचा हिंदुराष्ट्रवाद याला ऊत आला आहे तर अल्पसंख्यांकाच्या लोकशाही संविधाननिष्ठ राष्ट्रवादाला संपविण्याचे कार्य सुरू आहे. भारतीय संविधान हा राष्ट्रीय ग्रंथ आहे. यात भारतीय जीवनाचे सुंदर असे चित्र आणि मार्ग दाखविलेला आहे. परंतु याला नाकारून धार्मिक राष्ट्रवाद निर्माण करून देशाच्या अखंडतेला आणि एकात्मतेला बाधा पोहचविण्याचे कार्य राजकीय धुरीणांकडून होत आहे.

"जहॉ हिंदू होता है वहॉं कोई भी, कीसी का बंधू नही होता
कितने हिंदू है भारत मै? और बंधू भी?"(१७)

असा प्रश्न हिंदु राष्ट्रवाद्यांपुढे निर्माण केला आहे. हा राष्ट्रवाद बंधुभाव वाढवित नाही. उलट बंधुभावाची भावना संपुष्टात आणतो आणि देशापुढे नवे संकट निर्माण करतो. या हिंदुत्त्वाच्या गुलामीतून जोपर्यंत देशबांधव बाहेर पडणार नाही तो पर्यंत देशाची एकात्मता निर्माण होणार नाही. त्यामुळे राजकीय वातावरणाने हा राष्ट्रद्रोह करता कामा नये. संविधानाने अशा विभक्तांना 'आम्ही केले' या 'आम्हीचे' जतन करावे असे वामनदादांना वाटते.

### *वामनदादांच्या राष्ट्रकाव्यातील परदेश जाणीव व त्यांचे राष्ट्रप्रेम :–*

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यौत्तर काळातही या देशाच्या सार्वभौमत्वावर, त्यांच्या अखंडतेवर आणि सीमेवर हल्ले झाले आहे आणि अजूनही होत आहे. त्यामुळे देशाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. कश्मिर प्रश्नावरून भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेले युध्द, वाढलेली घुसखोरी, भारत आणि चीन यांच्यात झालेले युध्द आणि आता डोकलाम वादावरून निर्माण झालेली युध्दजन्य स्थिती, ताण-तणाव या सर्व घटनाप्रसंगावरून शेजारील राष्ट्रांपासून भारत सुरक्षित असल्याचे दिसत नाही. म्हणून वामनदादांनी 'जागा हा भारत देशा' या कवितेतून जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे.

"वामन असतांना बाकी, सेना ही सीमा राखी
तरी नीच नीतीचा पाकी, गोळयावर गोळे टाकी
राख ही सीमारेषारे... जागा हो भारत देशा रे" १८)

शेजारील राष्ट्रांची नीच नीती आहे. तेव्हा अशा शत्रूपासून आपण आपली सीमा रेषा राखण्याचे आवाहन यातून केले आहे.

"कश्मिर भारताचे देशाचे नाक आहे
त्यालाच डंखणारा गद्दार पाक आहे"(१९)

कश्मिर हे निसर्गाने दिलेले वैभव आहे. त्यामुळे ते आपल्या देशाचेनाक आहे. परंतु या कश्मिरच्या मुद्दयांवरून गद्दार

असलेला पाक सतत डंख मारतो आहे त्यामुळे कारगिलचे युध्द झाले. यात दोहोकडील प्राणहानी आणि वित्तहानी झाली. पाकच्या सततच्या कुरापतीने राष्ट्र धोक्यात सापडले आहे. विविध दहशतवादयांना कश्मिरमार्गे भारतात पाठविले जात आहे. भारतात अनेकदहशतवादयांनी हल्ले केले आहे. दुसरा शत्रू चीन आहे. चीन सोबत यापूर्वी युध्द झाले आहे. चीन हा देश जगात बौध्द देश म्हणून ओळखला जातो, तरीही या देशाने भारतासोबत सीमावादावरून संघर्ष केला आहे.चीन हा देश विस्तारवादी आणि आक्रमक भूमिका धारण करणारा आहे. त्यामुळे त्याच्याशेजारील राष्ट्र सतत भयगंडाने पछाडले आहे. वामनदादा ”उठा“ या कवितेते म्हणतात.

“जाळा पाकिस्तानी गुणी, चीन अथवा दुसरा कुणी<br>
येताच वीर उसळूनी, जा तेथेच गाडारणी“(२०)

अशा चीनमध्ये कम्युनिझमची सत्ता आहे. कम्युनिझम हा हिंसेचा मार्ग अवलंब करणारा आहे आणि बौध्द हा शांततेचा मार्ग अवलंब करणारा आहे. अशी चीनमध्ये अंतर्गत विरोधग्रस्तता असल्याने त्याच्या विस्तार वादी व आक्रमक भूमिके विरूध्द भारताने आक्रमक भूमिका धारण करावी. असे वामनदादांना वाटते. त्याशिवाय या देशाचे सार्वभौमत्व व अखंडत्व अबाधित ठेवता येणार नाही. म्हणून ते देशबांधवाना ‘उठा‘ असा संदेश देऊन त्यांना तेथेच गाडा असे म्हणतात.

”गोडी जरी जगाची भातात आज आहे<br>
किल्ली अमेरिकेच्या हातात आज आहे.“(२१)

जगाचा बादशाहा म्हणून अमेरिका हा देश ओळखला जातो. अमेरिकेने जगातील अनेक राष्ट्रांना अर्थसहाय केले आहे. अमेरिकेच्या इशाऱ्यावर जगातील राष्ट्रांचे संबंध निर्भर आहेत. म्हणून अमेरिका ठरवेल तो देश स्वस्थ आणि अस्वस्थ अशी किल्ली अमेरिकेच्या हातात आहे.

”या देशाची त्या देशाची, खरी प्रीत सारी चांगली असावी<br>
गळे घोटणारी सुरी ती नसावी, अशी प्रीत सारी अंतरी असवी“(२२)

परस्पर दोन देशात प्रेमाची, मैत्रीची भावना असावी, तेव्हाच परस्पर राष्ट्रांचा विकास होईल, सार्वभौमत्व सुरक्षित राहिल असे त्यांना वाटते.

”नको महाभारत, नको युध्द आता<br>
भारतात सारा आणू बुध्द आता<br>
वाटही धरू या रे, भारत नवा करू या“(२३)

आजवर राष्ट्रा-राष्ट्रात आणि राष्ट्रांतर्गत झालेले युध्द वैमनस्य, संघर्ष हे सर्व वगळूया आणि भारताला नवे करण्यासाठी युध्दाऐवजी बुध्द देऊ या, ही बुध्दांची वाटच भारतासह अनेक इतर राष्ट्रांना नवे करण्यात महत्वाची ठरणार आहे.

### *निष्कर्ष :-*

‘वामनदादा कर्डकांच्या राष्ट्राकाव्यातील राष्ट्रीय जाणीव आणि राष्ट्रप्रेम‘ याचा विचार केला असता खालीलप्रमाणे निष्कर्ष काढता येतात.

१) वामनदादा कर्डक हे आंबेडकरावादी वैचारिक कुळातील लोक प्रबोधनकार आहेत.

२) वामनदादांच्या राष्ट्रकाव्याच्या मागे आंबेडकरवादी राष्ट्रीय दृष्टी व निस्सिम राष्ट्रप्रेम कार्यरत आहे.

३) वामनदादांनी राष्ट्रकाव्यातून राष्ट्राला राष्ट्रांतर्गत असलेला जात, वर्ण, वर्ग, वंश याचा फार मोठा धोका असल्याचे सांगितले आहे.

४) वामनदादांनी राष्ट्रातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि परदेशी जाणीवेची वस्तुस्थिती अधोरेखित करून देशबांधवांना जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे.

५) वामनदादांनी देशातील सामाजिक आणि आर्थिक विषमतेची देशबांधवाना जाणीव करून दिली आणि यात समता जोपर्यंत येणार नाही तोपर्यंत एकमय राष्ट्रनिर्माण होणार नाही अशी भूमिका मांडली आहे.

६) संविधान नावाचा देशातील विभागलेल्या तुकडया तुकडयांना अतुट जोडणारा एकमेव राष्ट्रग्रंथ आहे.

७) संविधानानेच या देशातील लोकांना ‘आम्ही‘ केले आणि राष्ट्र सुध्दा केले.

८) देशाला सर्वात मोठा धोका कट्टर धर्मांधतेचा आहे. त्यामुळे ब्राह्मणवाद व भांडवलवाद यांची सरकारी सत्तेच्या मागे लपून देशात सत्ता सुरू आहे.

९) वामनदादांनी देश द्रोह करणाऱ्या जात व्यवहारांमागील अर्थनीतीचा विस्फोट केला आहे आणि खाजगी मालमत्तेवर अंकूश आणि उत्पादनावर मालकी सरकारची असावी अशी अपेक्षा केली आहे.

१०) वामनदादांनी राजकीय वातावरण अज्ञान, गुंड प्रवृत्ती आणि धनदांडग्याचे असल्यामुळे सर्वसामान्य माणसांचे शोषण थांबविणारा, नेता अस्तित्वात नाही. आंबेडकरां सारखा नेता असावा अशी अपेक्षा केली आहे.
११) वामनदादांनी देशाला हिंदू त्वाचा धोका आहे. जेथे हिंदू तेथे बंधू अस्तित्वात नाही. हा बंधूभाव संविधानाने निर्माण केला आहे.
१२) वामनदादांनी परदेशांशी मैत्रीचे, बंधू भावाचे संबंध ठेवावे, आपल्याला सहकार्य करीत असलेल्या देशांबरोबर राहावे आणि असहकार्य करीत असलेल्या देशांसोबत खंबीरपणे दोन हात करावेत असे सांगितले आहे.
१३) भारताला आणि जगाला नवे करण्यासाठी आंबेडकरवाद आणि बुध्दाशिवाय पर्याय नाही. यातून वामनदादांचे निस्सिम राष्ट्रप्रेम व्यक्त झालेले दिसते.

*संदर्भ :–*


१) बोराडे बाबा, आंबेडकरी लोकशाहीरः वामन कर्डक, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, जुलै– १९९५, पृ ५८
२) चौसाळकर डॉ. अशोक (संपा) धर्म, समाज आणि राजकारण, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती नोव्हे. २००४, पृ१५३
३) गायकवाड माधवराव, जाधव डॉ. सागर (संपा.) महाकवी वामनदादा कर्डक समग्र वाङ्मय खंड–४, आलोक संबोधी प्रकाशन, यवतमाळ, प्रथम आवृत्ती १४ एप्रिल २०१६, पृ. १७१
४) तत्रैव, पृ. ३२२
५) तत्रैव, पृ. १८६
६) तत्रैव, पृ. १८५
७) तत्रैव, पृ. १६८
८) तत्रैव, पृ. १३०
९) तत्रैव, पृ. ८२
१०) तत्रैव,पृ. १२६
११) तत्रैव,पृ. ८४
१२) दया पवार (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, तृतीय आवृत्ती, नोव्हें २००६, पृ. २०३, २०४.
१३) गायकवाड माधवराव, जाधव डॉ. सागर (संपा.), महाकवी वामनदादा कर्डकः समग्र वाङ्मय खंड–४, आलोक संबंधी प्रकाशन, यवतमाळ प्रथमावृत्ती, १४ एप्रिल २०१६, पृ ३६६.
१४) तत्रैव, पृ. १३३
१५) तत्रैव, पृ. २४०
१६) तत्रैव, पृ. ३३२
१७) तत्रैव, पृ. ४३८
१८) तत्रैव, पृ. १००
१९) तत्रैव, पृ. १८३
२०) तत्रैव, पृ. २६५
२१) तत्रैव, पृ. ६५
२२) तत्रैव, पृ. ३२६
२३) तत्रैव, पृ. २५४

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com